महा वितरण

# महावितरण विद्युत वार्ता

वर्ष ९ वे : अंक ९ | मार्च २०१४



**प्रत्येकाचाच** विजेशी संबंध येतो. वीज ही अत्यावश्यक गरज असल्याने तिची उपलब्धता विनाव्यत्यय असावी, अशी प्रत्येकाचीच अपेक्षा असते. ही अपेक्षा पूर्ण व्हावी यासाठी आपण सातत्याने प्रयत्नशील आहोतच. याच प्रयत्नांमुळे विजेच्या उपलब्धतेचा प्रश्न आपण यापूर्वीच निकालात काढलेला आहे. ग्राहकांना चांगल्या गुणवत्तेची वीज मिळावी यासाठीही आपण पायाभूत आराखडा मोठ्या प्रमाणात राबवतोय. त्यातही खूप मोठे काम झालेले आहे. विजेची उपलब्धता आणि वितरण यंत्रणा ही सक्षमच राहील, भविष्यात गरजेनुसार त्यात सुधारणा होत राहील, याची आपण पुरेपूर काळजी घेतलेली आहे. आता आपले लक्ष्य आहे ग्राहकांना आणखी चांगली सेवा देण्याचे.

ग्राहकांचा महावितरणसोबत संबंध येतो तो पहिल्यांदा ग्राहक होताना. यासाठी यापूर्वीच आपण सुटसुटीत असा एकपानी नवीन जोडणी घेण्यासाठीचा अर्ज लागू केलेला आहे. शिवाय सर्व वर्गवारीतील जोडण्यांसाठी ऑनलाईन अर्ज करण्याची, अर्जाची सध्यस्थिती तपासण्याची सोयही उपलब्ध करून दिलेली आहे. वीजबिले भरण्यासाठी रांगेत उभे राहायला लागू नये म्हणून ऑनलाईन बील भरणे तसेच एटीपी मशीनच्या माध्यमातून बील भरणे, अशा सोयीही आपण यापूर्वीच उपलब्ध करून दिल्या. याबद्दल ग्राहकांकडून समाधान व्यक्त करण्यात आलेले आहे. परंतु वीजपुरवठ्यातील किंवा वीज देयकातील काही अडचणी, काही तक्रारी वेळच्या वेळी सोडविण्यात अडचणी येतात, असे दिसते. ह्या तक्रारी किमान वेळेत व्यवस्थितपणे सोडविल्या जाव्यात अशी ग्राहकांची रास्त अपेक्षा असते. यासाठी आता-आता पर्यन्त राज्यभर तक्रार निवारण केंद्रे कार्यरत होती. परंतु याबाबत ग्राहकांचा अनुभव मिश्र स्वरुपाचा होता. यात सुधारणा व्हावी, हे काम अधिक व्यावसायिक पध्दतीने व प्रभावीपणे व्हावे यासाठी आपण नियोजन केले. स्थानिक मानवी हस्तक्षेपाशिवाय ग्राहकांच्या तक्रारी सोडविल्या जाव्यात, ग्राहकांना व्यवस्थित प्रतिसाद दिला जावा यासाठी मध्यवर्ती ग्राहकसेवा केंद्रांची निर्मिती करण्यात आली. आजच्या प्रचलित भाषेत याला कॉल सेंटर म्हटले जाते.

भांडुप येथे ६० आसनी आणि पुणे येथे पर्यायी स्वरुपाची ४० आसनी यंत्रणा उभी करण्यात आली. येथे काम करणाऱ्या सर्व संबंधितांना कंपनीचे कामकाज, कार्यक्षेत्र, तक्रारींचे स्वरुप, विविध प्रकारच्या कामातील खाचखळगे याबाबतचे व्यवस्थितपणे प्रशिक्षण देण्यात आले. गेल्या काही महिन्यांपासून राज्यभरात विखूरलेल्या स्थानिक तक्रार निवारण केंद्रांसोबत ही यंत्रणाही कार्यरत होती. स्वतंत्रपणे ही यंत्रणा कार्यरत व्हावी, यासाठी काही महिन्यांपूर्वी १ फेब्रुवारीपासून राज्यभरातील स्थानिक तक्रार निवारण केंद्रे पूर्णपणे बंद करण्यात येतील असे आपण जाहीर केलेले होते. आता ही केंद्रे बंद करण्यात आलेली आहेत.

ही मध्यवर्ती यंत्रणा कशी कार्यरत राहील, याबाबत जनमित्रांपासून ते मुख्य अभियंत्यांना वेळोवेळी माहिती देण्यात आलेली आहे. आलेल्या तक्रारींची तातडीने नोंद घेतल्या जावी, ती तक्रार किमान वेळेत दूर व्हावी, यासाठी आपण सर्व जनमित्र, उपविभागीय कार्यालय प्रमुखांपर्यन्त दूरध्वनी दिलेले आहेत. हे क्रमांक अद्ययावत राहतील याबाबतही आपण विशेष काळजी घेतलेली आहे. ग्राहकांच्या सर्व प्रकारच्या तक्रारी स्वयंचलित पध्दतीने नोंदविल्या जाव्या, या तक्रारी सोडविण्यासाठी त्या संबंधितांकडे पाठविल्या जाव्या, त्याचा पाठपुरावा केला जावा आणि ग्राहकांच्या तक्रारी व्यवस्थितपणे सुटाव्या अशी ही यंत्रणा स्थापन करण्यात आलेली आहे. कृतीच्या मानकांनुसार तक्रारींचे निवारण झाले नाही तर तक्रारी कार्यकारी अभियंता, अधीक्षक अभियंता, मुख्य अभियंता यांच्यापर्यन्त ठराविक काळाने वर्ग करण्याची तरतूद आहे. त्यामुळेच तक्रारींच्या गांभीर्यानुसार त्या माझ्यापर्यन्तही वर्ग होऊ शकतात.

आता या यंत्रणेची व्यवस्थितपणे अंमलबजावणी सुरू झालेली आहे. फेब्रुवारी या पहिल्याच महिन्यात राज्यभरातून विविध प्रकारच्या सुमारे ४० हजार तक्रारी नोंदविण्यात आल्या. त्या आपण चांगल्या पध्दतीने सोडविलेल्या आहेत. ही यंत्रणा आणखी यशस्वीपणे राबविली जाण्यासाठी सर्व दैनंदिन संनियंत्रण समित्या (डीएसएस), जनमित्र, शाखा अधिकारी, उपविभागीय अधिकारी यांनी यात विशेष प्रयत्न करायचे आहेत. सर्व तक्रारी सोडविण्यासाठी कुठल्याही परिस्थितीत कृतीची मानकेमध्ये ठरवून दिलेल्या कालावधीपेक्षा जास्त कालावधी लागणार नाही, यासाठी सर्व संबंधितांनी विशेष काळजी घ्यायची आहे. आपण यात कमी पडणार नाही, असा माझा विश्वास आहे.

**अजय मेहता**
व्यवस्थापकीय संचालक

## हितगुज

**" ग्राहकांच्या तक्रारी सोडविण्यासाठी अत्याधुनिक व सक्षम अशी मध्यवर्ती ग्राहक सेवा यंत्रणा उभारण्यात आली आहे. ग्राहकांच्या सर्व प्रकारच्या तक्रारी स्वयंचलित पध्दतीने नोंदविल्या जाव्या, तक्रारी सोडविण्यासाठी त्या संबंधितांकडे पाठविल्या जाव्या, त्याचा पाठपुरावा केला जावा आणि तक्रारी व्यवस्थितपणे सुटाव्या यासाठी ही यंत्रणा स्थापन करण्यात आलेली आहे. या यंत्रणेचा फायदा ग्राहकांना प्रत्यक्ष दिसायला हवा. त्यासाठी गांभीर्याने व संवेदनशीलपणे कार्यरत राहावे. "**

# महावितरणच्या "शह" नाटकाची यशस्वी भरारी



महापारेषणचे तत्कालिन व्यवस्थापकीय संचालक श्री.अरविंद सिंग यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना मुख्य अभियंता श्री. चंद्रशेखर येरमे व अधीक्षक अभियंता श्री. दिलीप घुगल .

नवी मुंबई येथे नुकत्याच झालेल्या आंतर विद्युत कंपन्यांच्या नाटय स्पर्धेत महापारेषणच्या 'सान्यांचं काही खरं नाही' या नाटकांने विजेतेपद तर महावितरणतर्फे सादर करण्यात आलेल्या चंद्रकांत शिंदे लिखीत व नितीन नांदुरकर दिग्दर्शीत अमरावती परिमंडळाच्या 'शह' या नाटकाने उपविजेतेपद पटकाविले.

म.रा.विद्युत मंडळ सुत्रधारी कंपनी तर्फे नेरुळ येथील आगरी कोळी संस्कृती भवनात दुसऱ्या अंतर कंपनी नाट्यस्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या नाटयस्पर्धेत महावितरण, महापारेषण व महानिर्मिती या कंपन्या सहभागी झाल्या होत्या. या नाटयस्पर्धेचे यजमानपद महापारेषणने भूषविले.

या स्पर्धेमध्ये महापारेषणतर्फे 'सान्यांचं काही खरं नाही' महानिर्मितीतर्फे 'सुखांशी भांडतो आम्ही' तर महावितरण तर्फे 'शह' ही प्रत्येक कंपनीच्या अंतर्गत झालेल्या नाट्यस्पर्धेतील विजेती नाटकं सादर करण्यात आली. महापारेषणचे तत्कालिन व्यवस्थापकीय संचालक श्री.अरविंद सिंग यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बक्षिस वितरण समारंभात 'शह' या नाटकास निर्मितीचे द्वितीय पारितोषिक मुख्य अभियंता श्री. चंद्रशेखर येरमे व अधीक्षक अभियंता श्री. दिलीप घुगल यांच्या नेतृत्वात 'शह' या नाटकाच्या चमूने स्वीकारले. याशिवाय पुरुष अभिनयाचे द्वितीय पारितोषिक श्री. अभिजीत सदाव्रती (नि. लि. ग्रा. वि. अमरावती), स्त्री अभिनयाचे प्रथम पारितोषिक सौ. संजीवनी पुरोहित, दिग्दर्शनाचे द्वितीय पारितोषिक श्री. नितीन नांदुरकर, (अनुदेशक,संगणक विभाग, परभणी मंडल), नेपथ्याचे द्वितीय पारितोषिक श्री.जयंत पैकिने (सहाय्यक अभियंता, बाळापूर उपविभाग), रंगभूषा व वेशभूषा या करिताचे द्वितीय पारितोषिक श्री.जगदिश बेहेरे (उपकार्यकारी अभियंता, भरारी पथक, नागपूर), पार्श्वसंगिताचे द्वितीय पारितोषिक श्री. मनीष भोपळे, व्यवस्थापक (मासं, अमरावती मंडल) व प्रकाश योजनेचे द्वितीय पारितोषिक श्री. विलास देशमुख (तंत्रज्ञ, भातकुली उपविभाग, अमरावती) यांना देण्यात आले. 'शह' या नाट्यकृतीच्या प्रभावी निर्मीतीसाठी अभियंता व अधिकाऱ्यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या नाटकात श्री. अभीजीत सदाव्रती, सौ. संजीवनी पुरोहित, श्री. सुधीर जोशी, श्री. हेमंत मसकरे, श्री.जगदिश बेहेरे, श्री. जयंत पैकिने, श्री. नितीन नांदुरकर, श्री. सुधीर खुजनारे, श्री. प्रवीण मुदलीयार, श्री. अमीत पंचगव्हाणकर इत्यादी कलावंतांनी आपापल्या भूमिका यशस्वीपणे वठविल्यात. रंगमंच सहाय्य तंत्रज्ञ नासीर अली बशीर अली व अमरावती शहर विभागाचे तंत्रज्ञ श्री. गणेश ठवकार यांनी केले.

# हिंजवडी, चाकणसह ४ एमआयडीसीमध्ये ब्रेकडाऊन अटेंडिंग व्हॅन




औद्योगिक वसाहतीमधील वीजपुरवठा अखंडित व सुरळीत राहावा यासाठी पुणे परिमंडलातील हिंजवडी, चाकण, भोसरी आणि आकुर्डी एमआयडीसीमध्ये विशेष दुरूस्ती यंत्रणा व ब्रेकडाऊन अटेंडिग व्हॅन ची २४ तास सेवा नुकतीच सुरू झाली आहे.

औद्योगिक वसाहतीतील वीजपुरवठा खंडित झाल्यास अथवा यंत्रणेत बिघाड झाल्यास तो कमीत कमी वेळेत पूर्ववत व्हावा यासाठी महावितरणने राज्यातील २५ एमआयडीसीमध्ये तात्काळ दुरूस्ती यंत्रणा उभारली आहे. यात पुण्याच्या हिंजवाडी (पिंपरी विभाग), आकुर्डी व भोसरी (भोसरी विभाग) आणि राजगुरूनगर विभागातील चाकण एमआयडीसीचा समावेश आहे. या चारही एमआयडीसीमध्ये स्वतंत्रपणे नुकतीच ही विशेष दुरूस्ती यंत्रणा कार्यान्वित झाली आहे.

या विशेष यंत्रणेत ब्रेकडाऊन अटेंडिग व्हॅन २४× ७ उपलब्ध आहे. २४ तासांच्या तीन पाळीत ही व्हॅन संबंधीत एमआयडीसीच्या परिसरात ठेवण्यात आली आहे.

# 'कृषी वसंत' मधील महावितरणच्या दालनाला दर्शकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद



महावितरणच्या दालनास भेट देऊन माहिती जाणून घेतांना शेतकरी व अन्य.

केंद्र सरकार, राज्य शासनाचा कृषी विभाग आणि भारतीय उद्योग संघटन यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूर येथील केंद्रीय कापूस संशोधन केंद्राच्या परिसरात आयोजित 'कृषी वसंत' या देशातील सर्वात मोठ्या राष्ट्रीय प्रदर्शनातील महावितरणच्या दालनाला दर्शकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून एक लाखापेक्षा जास्त नागरिकांनी या दालनाला भेट देऊन महावितरणच्या विविध योजना व ग्राहक उपयोगी सेवांची माहिती जाणून घेतली.



बिलात मिळत असलेल्या सवलतीची माहिती करून घेताना शेतकरी

या प्रदर्शनाचे उद्‌घाटन महामहिम राष्ट्रपती मा. प्रणव मुखर्जी यांच्या हस्ते झाले. यावेळी राज्यपाल मा. के. शंकरनारायणन, केंद्रीय कृषीमंत्री ना. श्री. शरद पवार, केंद्रीय अवजड उद्योगमंत्री ना. श्री प्रफुल्ल पटेल, मुख्यमंत्री ना. श्री.पृथ्वीराज चव्हाण, उपमुख्यमंत्री ना. श्री. अजित पवार, कृषीमंत्री ना. श्री.राधाकृष्ण विखे पाटील, नागपूर जिल्ह्याचे पालकमंत्री ना. श्री. शिवाजीराव मोघे, अन्न व नागरी पुरवठा मंत्री ना. श्री. अनिल देशमुख, केंद्रीय कृषी सचिव श्री.आशिष बहुगुणा, राज्याचे मुख्य सचिव श्री. जे.एस. सहारिया यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

महावितरणच्या या दालनात कृषिपंप आणि वीज बचत याबाबत सादर केलेली माहिती सर्वांच्या आकर्षणाची केंद्रबिंदू ठरली. विजेमुळे शेती व विजेमुळे प्रगती या सादरीकरणाच्या माध्यमातून मागील पाच वर्षात महावितरणने कृषिपंप ऊर्जीकरणात केलेली प्रगती सादर करण्यात आली. दर्शकांना सहज समजेल अशा चित्रातून विजेचे अपघात टाळण्याकरिता दिलेला संदेश अतिशय परिणामकारक असल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली. यासदंर्भात अनेकांनी आपले अभिप्रायही नोंदविले. ग्राहकांच्या घरापर्यंत वीज नेण्याकरिता महावितरणला प्रति युनिट ६.२१ रुपयांचा खर्च असून शेतकऱ्यांना सरासरी एक रुपया प्रति युनिट या दराने वीज उपलब्ध करून दिली जात असून हे दर कायम ठेवण्यासाठी राज्य शासनाकडून दिली जाणारी सबसिडी आणि इतर ग्राहकांना आकारली जाणारी



महावितरणच्या दालनात प्रदर्शित करण्यात आलेल्या पोस्टर्सचे निरिक्षण करताना शेतकरी वर्ग

क्रॉस सबसिडी आदींबाबत विस्तृत माहिती येथे सादर करण्यात आली. याशिवाय आज ८५ टक्के राज्य भारनियमनमुक्त असून याकरिता तेथील ग्राहकांनी वीज बिलांचा नियमित भरणा, विजेचा अधिकृत वापर आणि वीजचोरी विरोधातील महावितरणच्या मोहिमेला दिलेली साथ यामुळे हा भाग भारनियमनमुक्त झाला. इतर ग्राहकांनी याचे अनुकरण करून आपलाही भाग भारनियमनमुक्त करण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.




महावितरणची माहिती जाणून घेण्यास उसळलेली गर्दी

नागपूर शहर परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. मोहन झोडे, नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. सतिश बापट, नागपूर शहर मंडलाचे अधीक्षक अभियंता श्री. सुरेश मडावी यांनीही वेळोवेळी या दालनाला भेट देऊन दालनामध्ये राहून सामान्य नागरिक व ग्राहकांना माहिती देणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना प्रोत्साहन दिले.

# महावितरणमध्ये शिवाजी महाराज यांची जयंती साजरी



छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करतांना संचालक (प्रकल्प व संचालन) श्री. प्रभाकर शिंदे व अन्य.

महावितरण व महानिर्मिती कंपन्यांचे मुख्यालय असलेल्या प्रकाशगड येथे शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी महावितरण कंपनीचे संचालक (प्रकल्प व संचालन) श्री. प्रभाकर शिंदे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण केला. याप्रसंगी महानिर्मितीचे संचालक (संचालन) श्री. चंद्रकांत थोटवे, कार्यकारी संचालक (वाणिज्य) श्री. अभिजीत देशपांडे, मुख्य अभियंता (स्थापत्य) श्री. चंद्रकांत वाघ यांच्यासह महावितरण व महानिर्मितीचे वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रकाशगड मुख्यालयासह पुणे, औरंगाबाद, अमरावती परिमंडल व जळगाव परिमंडलामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली.

**पुणे परिमंडल** : छत्रपती शिवाजी महाराज यांचे स्वराज्य स्थापनेचे राजकीय उद्दिष्ट हे कोणत्या धर्मासाठी किंवा जातीसाठी नव्हते तर सामान्यातल्या सामान्य माणसाला समृध्द करण्याचे होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहासतज्ञ व




शिवजयंतीच्या कार्यक्रमात बोलताना ज्येष्ठ इतिहासतज्ञ डॉ. सदाशिव शिवदे, सोबत मुख्य अभियंते सर्वश्री निळकंठ वाडेकर व प्रभाकर देवरे.

विचारवंत डॉ. सदाशिव शिवदे यांनी केले.

महावितरण व महापारेषणच्यावतीने दरवर्षी प्रमाणे यंदाही शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी मुख्य वक्ते म्हणून डॉ. शिवदे बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महावितरणचे मुख्य अभियंता श्री. निळकंठ वाडेकर तर प्रमुख पाहुणे म्हणून महापारेषणचे मुख्य अभियंता श्री. प्रभाकर देवरे यांची उपस्थिती होती.

यावेळी मुख्य अभियंता श्री. निळकंठ वाडेकर व श्री. प्रभाकर देवरे यांनी मनोगत व्यक्त केले. अधीक्षक अभियंता श्री. अंकुश नाळे यांनी प्रास्ताविक केले तर श्री. उध्दव कानडे यांनी सूत्रसंचालन केले. उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. रामगोपाल अहिर यांनी आभार मानले. कार्यक्रमाला महावितरण व महापारेषणमधील अभियंते, अधिकारी, कर्मचारी व सर्व संघटनांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**औरंगाबाद परिमंडल** : औरंगाबाद परिमंडल कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त मुख्य अभियंता श्री. शंकर शिंदे यांच्या हस्ते शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी अधीक्षक अभियंते सर्वश्री सुभाष ढाकरे, आजीनाथ सोनवणे, सहाय्यक महाव्यवस्थापक (वि व ले) श्री. प्रकाश अहिरे, कार्यकारी अभियंते सर्वश्री साहेबराव मोरे, सुरेंद्र कटके, देवेंद्र जायस्वाल, सुनील काकडे, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. श्रीकृष्ण वायदंडे आणि इतर अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित हाते.



छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त उपस्थित मुख्य अभियंता श्री. प्रसाद रेशमे व अन्य.

**जळगाव परिमंडल** : जळगाव परिमंडल कार्यालयात आयोजित करण्यात आलेल्या छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त मुख्य अभियंता श्री. प्रसाद रेशमे यांनी शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून अभिवादन केले. याप्रसंगी कार्यकारी अभियंते सर्वश्री देवेंद्र उंबरकर, विभिषण निर्मळ, व्यवस्थापक (मासं) श्री. रामचंद्र वैदकर आदी प्रामुख्याने उपस्थित होते.

**अमरावती परिमंडल:** अमरावती परिमंडल कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहाने साजरी करण्यात आली. मुख्य अभियंता श्री. संजय ताकसांडे, अधीक्षक अभियंता श्री. किशोर मेश्राम व सौ. सा. हि. खांडेकर यांनी शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. या कार्यक्रमाचे संचालन व आभार प्रदर्शन उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. संजय ढोके यांनी केले.

**बारामती परिमंडल:** बारामती परिमंडल कार्यालयात छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहाने साजरी करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित अभियंते, अधिकारी, कर्मचाऱ्यांनी शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. कार्यकारी अभियंता (प्रशासन व सुरक्षा) श्री. भाऊसाहेब इवरे यांनी शिवाजी महाराजांच्या कार्यावर प्रकाश टाकला. समाज व राष्ट्राला पुढे न्यायचे असेल तर सर्वांनी शिवरायांचे विचार आचरणात आणण्याची गरज आहे, असे प्रतिपादन त्यांनी केले. याप्रसंगी उपव्यवस्थापक (मानव संसाधन) रामकृष्ण वाघमोडे, सहायक अभियंता संजय देवकाते यांच्यासह इतर कर्मचारी उपस्थित होते.

## वीज बिल वसुलीसाठी प्रामाणिक प्रयत्नांची आवश्यकता



आढावा बैठकीस मार्गदर्शन करताना कार्यकारी संचालक श्री. अभिजीत देशपांडे. सोबत मुख्य अभियंता श्री. शंकर शिंदे व अन्य.

महावितरणचा सर्वाधिक खर्च हा वीज खरेदीवर होत असतो. परंतु पाहिजे त्या प्रमाणात वसुली होत नाही. यामुळे महावितरणची आर्थिक स्थिती अतिशय बिकट झाली आहे. त्यामुळे वापरलेल्या प्रत्येक युनिटचे पैसे वसूल होणे आवश्यक असल्याचे कार्यकारी संचालक (वाणिज्य) श्री. अभिजीत देशपांडे यांनी म्हटले आहे.

औरंगाबाद परिमंडल कार्यालयात विशेष आढावा बैठक घेण्यात आली. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी औरंगाबाद परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. शंकर शिंदे, सहाय्यक उपस्थिती होती. महाव्यवस्थापक (वि व ले) श्री.प्रकाश अहिरे, उपमहाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान) श्रीमती कांचन राजवाडे, औरंगाबाद ग्रामीण मंडलचे अधीक्षक अभियंता श्री. आजिनाथ सोनवणे, सहाय्यक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्रीमती रेखा भाले, वरिष्ठ व्यवस्थापक (वि व ले) श्री. दत्तू कर्डीले, कार्यकारी अभियंते सर्वश्री सुनील काकडे, साहेबराव मोरे, श्री. अमसिध्द हुवाळे, श्री. देवेंद्र जायस्वाल, श्री. अनिलकुमार नितनवरे, श्री. चंद्रमनी मिश्रा आदींची उपस्थिती होती.

## २.५० लाख रु. एकरकमी भरणाऱ्या दोन शेतकऱ्यांचा सत्कार



सहाय्यक अभियंता श्री. राजपूत हे शेतकरी श्री. रवींद्र पाटील व श्री. अर्जुन बोराडे यांचा सत्कार करताना. सोबत अन्य.

औरंगाबाद परिमंडल अंतर्गत येणाऱ्या सोयगाव उपविभागातील पळसखेडा येथील शेतकरी श्री. अर्जून शंकर बोराडे व जरंडी येथील शेतकरी कृषिभूषण श्री. रवींद्र पाटील यांनी त्यांच्याकडे असलेली थकबाकी एकरकमी भरल्याबद्दल महावितरणच्यावतीने त्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.

औरंगाबाद परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. शंकर शिंदे, ग्रामीण मंडलाचे अधीक्षक अभियंता श्री. आजिनाथ सोनवणे, कार्यकारी अभियंता श्री. साहेबराव मोरे, सुनील काकडे यांच्या मार्गदर्शनाखाली कृषिपंपांची वीज बिल वसुली मोहिम राबविण्यात येत आहे.

सोयगाव उपविभागातील शेतकरी अर्जुन शंकर बोराडे, रा. पळसखेडा यांनी त्यांच्याकडे असलेली ९१ हजार १२० रुपयांची तसेच कृषिभूषण शेतकरी रविंद्र पाटील, रा. जरंडी यांनी त्यांच्याकडे असलेल्या एक लाख ६० हजार रुपयांची कृषिपंपाची एकरकमी थकबाकी जमा केली. त्यामुळे या दोन शेतकऱ्यांचा सहायक अभियंता राजेंद्र राजपूत यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी कनिष्ठ अभियंता श्री. राजेंद्र राठोड, एस. आर. अतनुर, के.जी. बनसोड, आर. आर. मिरगणे, ए. आर. दुबे, पांडुरंग घोडके , कर्मचारी , शेतकरी उपस्थित होते.

## महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या कबड्डी स्पर्धेत महावितरण महिला संघाला कांस्यपदक



आमदार श्री. भाई जगताप यांच्यासह स्पर्धेत कांस्यपदक पटकविणारा महावितरणचा महिला कबड्डी संघ

महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाद्वारे मुंबई येथे आयोजित १५ व्या राष्ट्रीय कबड्डी स्पर्धेत महावितरण महिला कबड्डी संघाने कांस्यपदक पटकाविले. महाराष्ट्रातून विविध जिल्ह्यातील एकूण ४४ संघ या स्पर्धेत सहभागी झाले होते.

तिसऱ्या स्थानासाठी झालेल्या अटीतटीच्या लढतीत महावितरण महिला संघाने अंकुर स्पोर्टस क्लब, मुंबई या संघावर रोमहर्षक विजय मिळविला. महावितरण संघाचे प्रशिक्षकाची जबाबदारी श्री. किरण देवाडिगा व संघव्यवस्थापकाची जबाबदारी श्री. संतोष विश्वेकर यांनी उत्तमरित्या पार पाडली.

या संघात हर्षला मोरे (कल्याण), राजश्री पवार (मुंबई), सायली कचरे (बारामती), अश्विनी शेवाळे (भांडुप), प्रियंका पाटील (भांडुप), भारती मोहिते (कल्याण), तेजश्री दर्डे (मुंबई), माया येलवंडे (पुणे), शर्वरी शेलार (कोल्हापूर), श्रध्दा देसाई (कल्याण), संजोली आचरेकर (भांडुप) हे खेळाडू सहभागी झाले होते.

या उत्तम कामगिरीबद्दल कार्यकारी संचालक (मा.स.) श्री. अभिजीत देशपांडे, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. किशोर पवार व उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. ललित गायकवाड यांनी संघाचे अभिनंदन केले आहे.

## तांत्रिक कामगारांचे रत्नागिरीत महाअधिवेशन संपन्न



महाअधिवेशनाच्या उद्‌घाटनप्रसंगी ना. नारायण राणे, पालकमंत्री ना. उदय सामंत, खा. निलेश राणे, सरचिटणीस श्री. सय्यद जहिरोद्दिन, अध्यक्ष श्री. नागोराव मगर व अन्य.

महाराष्ट्र राज्य वीज तांत्रिक कामगार संघटनेचे सोळावे महाअधिवेशन रत्नागिरी येथे मोठ्या उत्साहाने पार पडले.

या अधिवेशनास प्रमुख पाहुणे म्हणून उद्योगमंत्री ना. नारायण राणे, रत्नागिरीचे पालकमंत्री ना. उदय सामंत, खासदार श्री. निलेश राणे, मुख्य अभियंता श्री. सिध्दार्थ नागटिळक उपस्थित होते तर अध्यक्षस्थानी संघटनेचे अध्यक्ष श्री. नागोराव मगर, सरचिटणीस सय्यद जहिरोद्दिन, उपाध्यक्ष सदाशिव शेप, संघटन सचिव श्री. पी. के. भोयर, कोषाध्यक्ष ताराचंद कोल्हे आदी यावेळी उपस्थित होते. यावेळी पालकमंत्री ना. सामंत यांच्या हस्ते तांत्रिक दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले.

याप्रसंगी बोलतांना ना. नारायण राणे म्हणाले की, महावितरणचा तांत्रिक कर्मचारी आज अतिशय चांगले काम करत आहेत. त्यामुळेच आज महावितरणची वितरण हानी अतिशय कमी झाली असून वसुलीमध्ये सुधारणा झाली.

### मार्च Ending

चला सजग व्हा, जवळ आले आहे मार्च Ending
उद्दिष्टपूर्तीकरिता, करा कामाचे योग्य Planning !

सध्या चालू आहे, वाहिनीनिहाय लोड Shedding
त्यासाठी करा जोमाने वसुली, घेऊन योग्य मीटर Reading ll1ll

ग्राहकाचा अर्ज येता, करा ऑनलाईन Processing
त्वरित NSC भरून, करूया जलद Billing ll2ll

जास्त असता ग्राहकाकडे थकबाकी Pending
वसुली करा, करूनी ग्राहकास गुड Morning ll3ll

येता अडथळा वसुलीत, होऊन फिडर Breaking
ठेवा फिडर सुस्थितीत, करूनी ट्री Cutting ll4ll

सदैव पाऊल पुढे ठेवा, तुम्ही केले आहे Engineering
मग कसली तुम्हा भीती, जवळ येता मार्च Ending ll5ll

प्रभाकर के. दहापुते,
सहाय्यक अभियंता,
मंडल कार्यालय, अकोला

## Think Over it ....

### Commercial Circulars

**Subject:** Concession in Electricity Tariff by Govt. of Maharashtra (Commercial Circular No. 218 dt. 18/02/2014)

In order to reduce the present & impending impact of hike in electricity tariff, Government of Maharashtra has decided to give concession in electricity rates to the consumers under jurisdiction of MSEDCL vide Government Resolution dt. 29/01/2014 as under:

A) The rise in tariff in September 2013 for Residential (up to 0 to 300 units), Commercial, Industrial and Agricultural consumers is hereby reduced. These concessions are limited to Energy Charges.

B) These concessions are not applicable to Public Services, Public Water Works, Street Light, Railway tariff category.

C) The Financial burden of MSEDCL on account of concession in electricity tariff as above will be compensated by GoM on monthly basis in advance every month starting from February 2014 and the same will be reconciled on quarterly basis.

D) The concessional tariffs (As per Annexure "A") are to be applicable from 1st February 2014 till such time the Government of Maharashtra covers the difference by way of direct subsidy under section 65 of Electricity Act, 2003 and also as envisage in the Government Resolution.

The detail Commercial Circular with Annexure "A" is available on www.mahadiscom.in.

**S. H. Dhantole**
Chief Engineer (Commercial)

सूचना : परिपत्रकाचा सारांश फक्त माहितीकरिता देण्यात आला असून, प्रत्यक्ष अंमलबजावणीपूर्वी तसेच कायदेशीर स्पष्टीकरणासाठी संदर्भाधीन परिपत्रक संपूर्णपणे विचारात घेणे आवश्यक आहे.

**Our website http:/www.mahadiscom.in**

## 'सूत्रसंचालन एक प्रभावी कला' पुस्तकाचे प्रकाशन



पुस्तकाच्या प्रकाशन प्रसंगी श्रीमती तांबे, श्रीमती वाहोकार व अन्य.

श्रीमती मेघना वाहोकार लिखित 'सूत्रसंचालन एक प्रभावी कला' या पुस्तकाचे प्रकाशन साहित्य महामंडळाच्या माजी अध्यक्षा श्रीमती उषाताई तांबे यांच्या हस्ते करण्यात आले. विदर्भ साहित्य संघ व आधार यांच्या संयुक्त विद्यमाने नागपूर येथे राज्यस्तरीय लेखिका संमेलन आयोजित करण्यात आले होते. या संमेलनामध्ये सदर पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. श्रीमती वाहोकार यांच्या 'तिच्याही मनातील ऋतू' हा ललितबंध नुकताच प्रकाशित झाला आहे.

नागपूर शहर परिमंडलांतर्गत येणाऱ्या काटोल विभागातील कोंढाळी उपविभागात कनिष्ठ लिपिक म्हणून श्रीमती वाहोकार या कार्यरत आहेत.

# गौरव



## कु. रोहिणी आवारे यांना शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार

पुणे येथील कु. रोहिणी चिंतामणी आवारे यांना राज्य शासनाने सन २०११-१२ चा शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार नुकताच जाहीर केला आहे. खो-खो खेळप्रकारात शालेय, राज्य व राष्ट्रीयस्तरावरील विविध स्पर्धामध्ये उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल कु. रोहिणी आवारे यांना पुण्यात झालेल्या शानदार कार्यक्रमात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

कु. रोहिणी आवारे या पुण्याच्या पद्मावती विभागात निम्नस्तर लिपिक म्हणून कार्यरत आहे. कु. रोहिणी यांनी तब्बल २४ वेळा राष्ट्रीय स्पर्धेत सहभाग नोंदविला असून त्यांनी प्रतिनिधीत्व केलेल्या संघाने एकूण १२ सुवर्णपदक, ५ रौप्यपदक आणि ४ कांस्यपदक पटकाविले. याशिवाय भारतीय ऑलम्पिक संघटनेच्या राष्ट्रीय स्पर्धेत दोनवेळा कु. रोहिणी यांनी प्रतिनिधित्व केले आहे. रोहिणीने महाराष्ट्राच्या खो-खो संघाचे चारवेळा कर्णधारपद भूषविले आहे. सन २००५-०६मध्ये त्यांना उस्मानाबाद जिल्हयातील सर्वोत्कृष्ट खेळाडू पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. बार्शी विभागातील कनिष्ठ अभियंता श्री. चिंतामणी अण्णा आवारे यांची कु. रोहिणी ही मुलगी आहे.

## योगेश तायडे यास सुवर्णपदक



पुणे येथे नुकत्याच झालेल्या ५९ व्या राष्ट्रीय रोलबॉल शालेय स्पर्धेत १९ वर्षाखालील वयोगटात चि. योगेश विठ्ठल तायडे याने सुवर्णपदक प्राप्त केले.

क्रीडा व युवक कल्याण मंत्री श्री. पद्माकर वळवी यांच्या हस्ते चि. योगेश याला सुवर्णपदक देण्यात आले. याच स्पर्धेत सलग दुसऱ्या वर्षी चि. योगेश याने सुवर्णपदक मिळविले आहे. जळगाव मंडल कार्यालयात कनिष्ठ लिपिक म्हणून कार्यरत असलेले श्री. विठ्ठल नामदेव तायडे व कनिष्ठ लिपिक सौ. संध्या पाटील यांचा तो मुलगा आहे. जळगाव परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. प्रसाद रेशमे व अधीक्षक अभियंता श्री. अशोक शिंदे यांनी योगेशच्या या यशाबद्दल कौतुक केले.

## प्रतिक देशभ्रतार याला स्के मार्शल आर्ट मध्ये कांस्यपदक



स्कूल गेम्स फेडरेशन ऑफ इंडिया तर्फे दिल्ली येथे नुकत्याच झालेल्या ५९ व्या राष्ट्रीय शालेय क्रीडा स्पर्धा २०१३-१४ मध्ये ५० किलो वजन गटातील स्के मार्शल आर्ट स्पर्धेमध्ये प्रतिक देशभ्रतार याने चांगली कामगिरी करीत कांस्यपदक पटकाविले.

प्रतिक हा ब्रिजलाल बियाणी कॉलेज, अमरावती येथे इयत्ता १२ वीत शिकत असून तो वाशिम मंडलातील ३३ किव्हो उपकेंद्र, मानोरा येथे कार्यरत कनिष्ठ यंत्रचालक श्री. किशोर देशभ्रतार यांचा मुलगा आहे.

## बॅडमिंटन स्पर्धेत श्री. असद शेख देशात पाचवा



आंध्रप्रदेशातील खम्मम येथे नुकत्याच झालेल्या ऑल इंडिया सिनियर नॅशनल बॉल बॅडमिंटन चॅम्पियनशीप स्पर्धेमध्ये श्री. असद शेख यांनी पाचवे स्थान मिळविले. खम्मम येथे झालेल्या स्पर्धेत देशातील ४० संघांनी भाग घेतला होता. गंगाखेड उपविभागात कनिष्ठ लिपिक म्हणून कार्यरत असलेले श्री. शेख हे आपल्या कार्यालयीन कामासोबतच खेळाडूंना प्रशिक्षण देण्याचे काम करीत आहेत. त्यांनी दिलेल्या प्रशिक्षणामुळे अनेक खेळाडू आज राज्य व राष्ट्रीयस्तरावर उत्तम कामगिरी बजावित आहेत.

यापूर्वी राज्यस्तरीय बॉल बॅडमिंटन स्पर्धेत रजत पदक मिळवून श्री. शेख यांनी राष्ट्रीय संघात प्रवेश मिळविला. श्री. शेख यांनी नेपाळ व थायलँड येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय बॉल बॅडमिंटन स्पर्धेत भारताचे कर्णधारपद भूषविले असून या स्पर्धेत भारताला विजय मिळवून दिल्याबद्दल स्टार ऑफ इंडिया या पुरस्काराने त्याचा गौरव करण्यात आला आहे.

श्री. शेख यांच्या कामगिरीबद्दल परभणी मंडलाचे अधीक्षक अभियंता श्री.एस.एल. गणेशकर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच नांदेड परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. सतिश करपे, शिक्षण महर्षी श्री.डी.बी.लोहारे, श्री.सुनील कोटलवार, श्री.संतोष नांदे आदीनी त्याचे कौतुक केले.

## पिंटू जाधव ज्यु. भारतकुमारचा मानकरी



हरयाणातील भिवानी जिल्ह्यात झालेल्या अखिल भारतीय कुस्ती स्पर्धेत बारामती तालुक्यातील खांडज येथील नामांकित मल्ल पिंटू ऊर्फ एकनाथ वामनराव जाधव याने ७४ किलो वजन गटात विजेतेपद पटकावले. पिंटूने अंतिम लढतीत दिल्लीच्या गुरू हनुमान आखाड्याचा मल्ल महिपालसिंग यास चितपट करून सुवर्णपदक, चांदीची गदा व ज्यु.भारतकुमार केसरीपदाचा मान मिळवला. अखिल भारतीय कुस्ती परिषदेच्या वतीने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. स्थानिक आमदार रघुबीर चिल्लर व सहाय्यक पोलिस आयुक्त मनोजसिंग यांच्या हस्ते पिंटूचा पारितोषिकाने गौरव करण्यात आला. विजेता म्हणून पिंटूला होंडा कंपनीतर्फे ड्रीम युग ही मोटारसायकल देऊन सन्मानित करण्यात आले. बारामती परिमंडलाचे सहायक महाव्यवस्थापक (मा.सं.) श्री. वामनराव जाधव यांचा पिंटू हा सुपूत्र आहे.

## खेळांमुळे खेळाडूवृत्ती निर्माण होण्यास मदत

खेळांमुळे खेळाडूवृत्ती निर्माण होते आणि या खेळाडूवृत्तीचा वापर आपण आपल्या दैनंदिन कामात केल्यास त्याचे चांगले परिणाम होतात, असे प्रतिपादन जळगाव परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. प्रसाद रेशमे यांनी केले.

जळगाव परिमंडल कार्यालयाच्या परिसरात अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी घेण्यात आलेल्या व्हॉलीबॉल सामन्याच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.याप्रसंगी अधीक्षक अभियंता श्री. अशोक शिंदे, कार्यकारी अभियंता श्री. देवेंद्र उंबरकर, प्रभारी महाव्यवस्थापक श्री. सुरेश बागले, श्री. पराग चौधरी, मोहन गारूगे अणि इतर अधिकरी व कर्मचारी उपस्थित हाते.

## महावितरणचे संचालक (दक्षता व सुरक्षा) म्हणून डो. कनकरत्नम रुजू



श्री.डो. कनकरत्नम यांनी महावितरणच्या संचालक (दक्षता व सुरक्षा) पदाची सूत्रे नुकतीच स्वीकारली. यापूर्वी कार्यरत संचालक (दक्षता व सुरक्षा) श्री. जगन नाथ यांची बदली झाली असून त्यांच्या रिक्त झालेल्या पदावर श्री.कनकरत्नम यांची नियुक्ती झाली आहे.

श्री. कनकरत्नम यांनी यापूर्वी महाराष्ट्र राज्य मानवाधिकार आयोगाचे महासंचालक, नागपूर शहर विभागाचे सह पोलिस आयुक्त व राज्य सीआयडी विभागात विशेष महासंचालक म्हणून काम केले आहे. त्यांना महाराष्ट्र शासनाकडून १९९६ मध्ये विशेष सेवा पदक, २००६ मध्ये गुणवत्तापूर्ण सेवेसाठी पोलिस पदक व २०१३ मध्ये राष्ट्रपती पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

## वर्ल्ड एचआरडी कॉंग्रेस तर्फे महावितरणला बेस्ट एम्प्लॉयर ऑफ द इयर पुरस्कार




मान्यवरांकडून पुरस्कार स्वीकारतांना मुख्य महाव्यवस्थापक (प्रशिक्षण व सुरक्षा) श्री. चंद्रशेखर येरमे व कार्यकारी अभियंता श्री. नरेंद्र सोनवणे

ग्राहकसेवेप्रति तत्पर असलेल्या महावितरणच्या शिरपेचात आणखी एक तुरा रोवला गेला आहे. जागतिक स्तरावरील नामांकीत असलेल्या वर्ल्ड एचआरडी कॉंग्रेस २०१४ तर्फे नुकताच महावितरणला बेस्ट एम्प्लॉयर ऑफ द इयर तसेच महावितरणच्या प्रशिक्षण व सुरक्षा केंद्र एकलहरे, नाशिक यांना उत्कृष्ट कामगिरीसाठी एक्सलन्स इन ट्रेनिंग हे पुरस्कार देवून नुकतेच सन्मानित करण्यात आले.

मुंबई येथील हॉटेल ताज येथे पार पडलेल्या एका विशेष समारंभात आरजीएफ मॅनेजमेंट सर्च चे कार्यकारी संचालक डॉ. संजय मुथल यांच्या हस्ते हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. महावितरण कंपनीच्या प्रशिक्षण व सुरक्षा केंद्राला देण्यात आलेला पुरस्कार मुख्य महाव्यवस्थापक (प्रशिक्षण व सुरक्षा) श्री.चंद्रशेखर येरमे व त्यांचे सहकारी कार्यकारी अभियंता श्री. नरेंद्र सोनवणे यांनी स्वीकारला.

जागतिक स्तरावरील वर्ल्ड एचआरडी कॉंग्रेस २०१४ या परिषदेत महावितरण कंपनीच्या प्रशिक्षण व सुरक्षा, एकलहरे, नाशिक यांस नामांकीत केले होते. महावितरणने प्रशिक्षण क्षेत्रात केलेल्या उल्लेखनिय कामगिरीचे सादरीकरणाचे मुल्यमापन मानव संसाधन परिषदेने प्रत्यक्ष मुलाखती द्वारे केले.

महावितरण तर्फे कार्यकारी संचालक (मानव संसाधन) श्री. अभिजीत देशपांडे यांचे मार्गदशनाखाली हे सादरीकरण व मुलाखत देण्याचे कार्य मुख्य महाव्यवस्थापक (प्रशिक्षण व सुरक्षा)श्री. चंद्रशेखर येरमे व त्यांचे सहकारी कार्यकारी अभियंता श्री. नरेंद्र सोनवणे यांनी केले. महावितरण शिवाय इतरही विख्यात खासगी कंपन्या या स्पर्धेत सहभागी झाल्या होत्या.

या कामगिरीबद्दल व्यवस्थापकीय संचालक मा.श्री. अजय मेहता व संचालक मंडळ यांनी कार्यकारी संचालक (मानव संसाधन)श्री. अभिजीत देशपांडे व त्यांचे सहकारी मुख्य महाव्यवस्थापक (प्रशिक्षण व सुरक्षा)श्री.चंद्रशेखर येरमे व कर्मचारी वृंदाचे अभिनंदन केले आहे.

## नागपूर चाचणी प्रयोगशाळेस प्रथम क्रमांकाचा 'पार एक्सलेन्स' ॲवार्ड




'पार एक्सलेन्स' चा पुरस्कार स्वीकारताना कार्यकारी अभियंता श्री. मनिष वाठ व उपकार्यकारी अभियंता श्री.अविनाश कठाणे व अन्य

नागपूर येथील इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअर्स व एस. क्यू. एम. एस. यांच्या संयुक्त विद्यमाने क्वॉलिटी प्रोग्रेस २०१४ स्पर्धा नागपूर येथे नुकतीच घेण्यात आली. या स्पर्धेत नागपूर शहर चाचणी विभागातील गुणवत्ता व नियंत्रण प्रयोगशाळेला प्रथम क्रमांकाचा 'पार एक्सलेन्स' (उत्कृष्टतेचा) तर औरंगाबाद ग्रामीण चाचणी गुणवत्ता व नियंत्रण प्रयोगशाळेला सलग दुसऱ्यांदा प्रथम क्रमाकांचा गोल्डन ॲवार्ड मिळाला. तसेच नाशिक चाचणी प्रयोगशाळेलाही यावेळी पुरस्कार मिळाला.

या स्पर्धेत आतंरराष्ट्रीय दर्जाच्या विविध शासकीय, निमशासकीय, खाजगी, औद्योगिक व शैक्षणिक संस्थानी सहभाग घेतला व त्यांच्या कामाच्या गुणवत्तेबाबत विविध कार्यपध्दती व उपलब्ध साधनांचे सादरीकरण केले. महावितरणतर्फे या स्पर्धेत नागपूर शहर चाचणी विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. मनिष वाठ, उपकार्यकारी अभियंता श्री. अविनाश कटाणे, कनिष्ठ अभियंता श्रीमती शीतल लोखंडे व श्री. रितेश जयस्वाल यांनी सादरीकरण केले. तर औरंगाबाद ग्रामीण चाचणी विभागातर्फे कार्यकारी अभियंता श्री सुरेंद्र कटके व कनिष्ठ अभियंता श्री.विनोद शेवनकर, कारागीर 'अ' श्री एस. एस. गाजरे यांनी गुणवत्ता नियंत्रण प्रयोगशाळेतील केलेल्या गुणवत्ता वाढीचे व कार्यपध्दतीचे सादरीकरण केले.

नागपूर व औरंगाबाद प्रयोगशाळेची गुणवत्ता व अत्याधुनिकता जपण्यासाठी नागपूर शहर परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. मोहन झोडे,औरंगाबाद परिमंडलाचे मुख्य अभियंता श्री. शंकर शिंदे, अधीक्षक अभियंता (नागपूर) श्री. जे. एम. पारधी, अधीक्षक अभियंता (औरंगाबाद) श्री. आजिनाथ सोनवणे आदींनी मौलिक मार्गदर्शन व प्रोत्साहन दिले.

Printed & Published by Shri. Ramdas Sampat Dolonde of Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.
Printed at **Jyotirling Enterprises**, 315 - B. Dean Bldg. Compound, Shop No. 32,
N. M. Joshi Marg, Lower Parel (E), Mumbai - 400 011. Tel. No.: 2300 2574
& Published at Hongkong Bank Bldg, M. G. Road, Fort, Mumbai - 400 001.
The Company accepts no responsibility for the matter published in the journal.

संपादक: राम दोतोंडे
मुख्य महाव्यवस्थापक (जनसंपर्क)
पत्रव्यवहाराचा पत्ता : संपादक, महावितरण विद्युत वार्ता,
प्रकाशगड, बांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१.
(खाजगी वितरणासाठी)